शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत
मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेबाबत॰

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक --/२०१९ /प्र.क्र.--/--
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- जुलै २०१९

वाचा : -

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९
२) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन शासन निर्णय दि.२०/०८/२०१०
३) शाळाबाह्य मुलांना नियमित शाळेत दाखल करणे आणि उपस्थिती टिकवून ठेवणे यासाठी उपाययोजना शासन निर्णय दि.२८ मार्च २०१३
४) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंमलबजावणी शासन निर्णय दि.२२/०६/२०१५
५) सरल प्रणाली शासन निर्णय दि.०३/०७/२०१५
६) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय दि.०९/०१/२०१७
७) विशेष गरजा असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्याच्या अध्ययन शैली नुसार मुल्यांकन बाबत, शैक्षणिक सवलती बाबत शासन निर्णय दि.१६/१०/२०१८.

प्रस्तावना :-

बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, राज्यात दि.१ एप्रिल २०१० रोजी कार्यान्वित झाला आहे. सदर कायद्यांतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेच्या पटावर नोंदविले जाणे, बालकांनी नियमित शाळेत येणे आणि त्याला दर्जेदार शिक्षण मिळणे हा हक्क प्राप्त झाला आहे. शाळेत न जाणारी बालके ज्यांनी शाळेत प्रवेश घेतलेला नाही किंवा ज्या बालकांनी प्रवेश घेऊन प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेले नसेल असे ६ ते १४ वयोगटातील बालक एक महिन्यापेक्षा अधिक काल सातत्याने अनुपस्थित राहत असेल तर त्या बालकांना शाळाबाह्य बालक म्हणावे अशी व्याख्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार केली आहे. सदर व्याख्या विचारात घेता राज्यात आजही अनेक बालके विविध कारणांमुळे शाळाबाह्य आहेत हे वास्तव नाकारून चालणार नाही.

महाराष्ट्रातील पावसाचे प्रमाण कमी असणाऱ्या मराठवाड्याच्या जिल्ह्यांमधून म्हणजेच बीड, जालना, नांदेड, लातूर, औरंगाबाद या दुष्काळग्रस्त भागातून, उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, नाशिक या जिल्ह्यातून

आणि विदर्भातील यवतमाळ, अकोला या जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात कुटुंबे स्थलांतर करीत असतात. स्थलांतर करणारी कुटुंबे ही आर्थिक स्तर निम्न असलेल्या वंचित समाजातील गटातील, भूमिहीन अथवा अल्पभूधारक असतात. साधारणत: सप्टेंबर नंतर ही कुटुंबे, महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राच्या जवळच्या राज्यात स्थलांतर करतात. मोठ्या प्रमाणात कुटुंबे ऊसतोडणी साठी पाश्चिम महाराष्टातील सोलापूर, कोल्हापूर, पुणे, सातारा, अहमदनगर येथे तर शेजारी असणाऱ्या कर्नाटक व गुजरात येथे स्थलांतर करतात. जरी जालना, बीड, लातूर येथून कुटुंबे ऊसतोडणी साठी इतर ठिकाणी स्थलांतर करत असली तरी नाशिक, यवतमाळ येथून काही कुटुंबे जालना, बीड, लातूर येथे स्थलांतर करताना आढळतात. स्थलांतराचा कालावधी हा सप्टेंबर किंवा ऑक्टोबर ते एप्रिल किंवा मे असा साधारणत: सहा ते आठ महिने इतका असतो. ऊसतोडणीसाठी मोठ्या प्रमाणात कुटुंबे स्थलांतर करताना जरी दिसत असली तरी वीटभट्टी, दगडखाण, कोळसाखाणी, शेतमजुरी, बांधकाम व्यवसाय, सार्वजनिक बांधकाम विभागातील कामे करण्यासाठी उदा. रस्ते, नाले तसेच जिनिंग मिल या प्रकारच्या कामांसाठी ही कुटुंबे स्थलांतर करीत असतात.

मुले कुटुंबासोबत स्थलांतर करीत असल्यामुळे, सहा ते आठ महिन्याच्या कालावधीसाठी त्यांची शाळेत अनुपस्थिती असते. मोठ्या प्रमाणातील अनुपस्थिती मुळे बालके शिक्षणापासून वंचित राहिल्याने त्यांना अध्ययन कौशल्ये अवगत होत नाहीत. परिणामी, मुलामध्ये न्यूनगंड निर्माण होऊन मुलं शाळा सोडून देतात व आपल्या आईवडीलांना रोजगारात व कामात मदत करताना, अप्रत्यक्षपणे मजुरीच्या गर्तेत ओढली जातात. मुलांना स्थलांतरात सोबत न्यावे किंवा नाही याबाबतचा संपूर्ण अधिकार हा त्या कुटुंबाचा आहे. पण त्यामुळे, मुलांच्या शैक्षणिक हक्काचे नुकसान होऊ नये यासाठी सर्व शासकीय विभागांनी एकत्रितपणे योग्य नियोजन करून कृती करायला हवी. व त्याचे सातत्याने सनियंत्रण होणे गरजेचे आहे.

स्थलांतरीत कुटुंबांतील या मुलांना स्थलांतर केलेल्या ठिकाणी शाळेत प्रवेश घेण्यास अनेक अडचणीना सामोरे जावे लागते जसे

१. कारखान्याच्या किंवा कामाच्या ठिकाणीच वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांच्या राहात्या जागेपासून शाळा दूर असणे.
२. काही कुटुंबांना सातत्याने एका शेतातून दुसऱ्या शेतात स्थलांतर करावे लागत असल्याने शाळेत कोणत्या घालावे व स्थलांतराचा कालावधी जास्तीत जास्त एका शेतात दोन ते चार दिवसाचा असल्याने किती शाळा बदलाव्यात याबाबत प्रश्न निर्माण होत आहे.
३. वीटभट्टी, दगडखाण, जिनिंग मिल अथवा बांधकाम साईट यापासून जरी शाळा जवळ असली तरी एकतर या मुलांपर्यंत शाळा पोहचत नाही किंवा मुलांना शाळेत पाठविण्याची पालकांची मानसिकता देखील नसते.
४. मुलांनी शाळेत प्रवेश जरी घेतला तरी अभ्यासा बाबत असणारी मुलांची भीती व त्यामुळे येणारा न्यूनगंड त्यामुळे शाळा न आवडणे.

५. काही शाळेत अथवा गावात या स्थलांतरीत कुटुंबाला आणि मुलांना परक्यांसारखे वागवत असल्यामुळे मुलांमध्ये आपलेपणाची भावना तयार होत नाही मग ही मुलं शाळेपासून दुरावतात.

शाळाबाह्य बालकांच्या शैक्षणिक समस्या वेगवेगळ्या आहेत त्यानुसार त्यावर उपाय योजना करणे आवश्यक आहे. तथापि विविध पातळ्यांवर शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरीत बालकांचा शोध घेऊन त्यांना शिक्षण प्रवाहात नियमित टिकवून ठेवण्यासाठी शासनाच्या शिक्षण विभाग स्तरावर, जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम अंतर्गत बालरक्षक चळवळ जोम धरत आहे. शाळाबाह्य मुलांसाठी काम केलेल्या व परिणाम मिळालेल्या शिक्षकांना बालरक्षक म्हणून काम करण्याची संधी देण्यासाठी ऑनलाईन लिंकद्वारे माहिती मागविण्यात आली आहे. त्यामध्ये जवळपास २६००० शिक्षकांनी स्वयंप्रेरणेने नावनोंदणी केली आहे. नावनोंदणी केलेल्या शिक्षकांना राज्य, विभागस्तरावर समता मूलक विचाराच्या माध्यमातून शाळाबाह्य, स्थलांतरीत, अनियमित शाळेत उपस्थित असलेल्या बालकांच्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षकांचे बालरक्षक प्रशिक्षणाद्वारे सक्षमीकरण करण्यात येत आहे.

दि. ९ जानेवारी २०१७ शासन परिपत्रकानुसार बालरक्षक म्हणून प्रत्येक तालुक्यातून किमान दोन, आदिवासी बहुल विविध बोलीभाषेच्या क्षेत्रामधील प्रत्येक केंद्रामधून प्रत्येक दोन व्यक्तीची आणि शहरी भागात प्रत्येक केंद्रातून किमान ५ व्यक्तींची निवड करण्यात येऊन त्यांचे राज्य व विभागस्तरावर २२७० बालरक्षकांना प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या, समता विभागा मार्फत देण्यात आलेले आहे. मुले शाळाबाह्य होण्याच्या अनेक कारणापैकी, गुणवत्तापूर्ण शिक्षण न मिळणे हे एक कारण आहे. बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यासाठी शिक्षक सक्षमीकरण हा महत्वाचा भाग आहे. ज्या शाळेमध्ये गुणवत्ता चांगली आहे त्या शाळेतील मुले शाळाबाह्य तसेच स्थलांतरीत होत नाही हे राज्यातील अनेक शाळांनी सिद्ध केले आहे. शाळाबाह्य बालकांच्या शिक्षणाला अधिक गती देण्यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागांचे सहकार्य व सक्रिय योगदान आवश्यक आहे.

राज्य ते गाव पातळीवर एक सूत्रता रहावी यासाठी खाली दर्शविल्याप्रमाणे शासनाच्या विविध विभागांचे सहकार्य घेऊन समितींचे गठन करण्यात येत आहेत. त्यानुसार प्रत्येक समितीच्या भूमिका, जबाबदारी व कर्तव्ये, यांची निश्चिती करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन परिपत्रक :-**

**शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरीत मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करण्यासाठी शासन यंत्रणेतील विविध घटकांची भूमिका व जबाबदारी -**

**अ) राज्यस्तरीय सुकाणू समिती संरचना :-**

१. अप्पर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - अध्यक्ष
२. आयुक्त, शिक्षण - उपाध्यक्ष

३. आयुक्त, साखर - सदस्य
४. आयुक्त, अल्पसंख्यांक - सदस्य
५. आयुक्त, आदिवासी विकास विभाग - सदस्य
६. आयुक्त, अपंगकल्याण - सदस्य
७. आयुक्त, महिला व बालकल्याण - सदस्य
८. आयुक्त, समाजकल्याण विभाग - सदस्य
९. आयुक्त, कामगार - सदस्य
१०. संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय - सदस्य
११. शिक्षण संचालक, (प्राथमिक) - सदस्य
१२. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे.
१३. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे - सदस्य
१४. स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनिधी (दोन पैकी एक महिला) - सदस्य
१५. सहसंचालक, ( नियोजन व प्रशासन), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई. - सदस्य सचिव

**राज्य सुकाणू समितीचे कामकाज :-**

१. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी कार्यवाही करणे.
२. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या नियंत्रणाखाली शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) यांचेकडून शाळाबाह्य मुलांची, वर्षातून (जून, सप्टेबर व जानेवारी) तीन वेळा सर्व विभागांच्या सहकार्याने शोध मोहीम करून घेणे व त्याबाबतचा त्रैमासिक आढावा घेणे.
३. शोध मोहिमे करिता तंत्रज्ञानाचा वापर करून (सरल सिस्टीमद्वारे) शाळाबाह्य / अनियमित / वयानुरूप प्रवेशित होणाऱ्या मुलांचा शोध घेऊन नोंदी करण्याबाबत शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यंत्रणेवर जबाबदारी निश्चित करणे व त्याबाबतचा बैठकीमध्ये आढावा घेणे.
४. बालकांना किमान १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक विविध विभागांच्या शासकीय योजनांचा लाभ मिळत असल्याचा आढावा घेणे.
५. स्थलांतरीत होणाऱ्या बालकांना शिक्षण हमी कार्ड देण्याबाबत जिल्हास्तर यंत्रणेला आदेशित करणे. स्थलांतरीत व शाळाबाह्य बालका संदर्भात कामे व्यवस्थित पार पाडत नसल्यास संबधित क्षेत्रीय अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करणे.
६. सरल सिस्टीम मध्ये स्थलातरीत बालकांचे शिक्षण हमी कार्ड अपलोड करणे बंधनकारक करून त्याचा आढावा घेणे.
७. पालकांसोबत बालकांचे होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यासाठी जिल्हा समित्यांना निर्देश देणे. प्रयत्न करूनही बालके स्थलांतरीत होत असल्यास बालकांना जिल्ह्यातील

इतर विभागांच्या उपलब्ध असलेल्या निवासी वसतिगृहामध्ये बालकांची स्थलांतर कालावधी मध्ये तात्पुरती व्यवस्था करून देण्याचे निर्देश जिल्ह्यांना देणे.

८. शाळाबाह्य/अनियमित दिव्यांग मुलांच्या इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या २१ प्रकारातील विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण व शैक्षणिक सवलतीबाबत पर्यवेक्षीय यंत्रणेकडून आढावा घेणे.

९. चाइल्ड हेल्प लाईन नंबर (टोल फ्री क्रमांक) सर्व शाळांच्या दर्शनी भागात प्रदर्शित करण्याबाबत सर्व जिल्हास्तरीय यंत्रणेला आदेशित करणे.

ब) जिल्हास्तर कमिटी -

१. मुख्य कार्यकारी अधिकारी - अध्यक्ष
२. जिल्हाधिकारी यांनी निर्देशित केलेले प्रतिनिधी - सदस्य
३. जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी निर्देशित केलेले प्रतिनिधी - सदस्य
४. अतिरिक्त आयुक्त, म.न.पा./ मुख्याधिकारी न.पा. - सदस्य
५. प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायीक विकास संस्था - सदस्य
६. महिला व बालविकास अधिकारी - सदस्य
७. जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
८. स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी (दोन पैकी एक महिला) - सदस्य
९. जिल्हा समन्वयक, बालरक्षक, लिंग समभाव व मुलींचे शिक्षण, समावेशित शिक्षण - सदस्य
१०. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) - सदस्य
११. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) - सदस्य सचिव

क) महानगरपालिका स्तर कमिटी -

१. आयुक्त, म.न.पा. - अध्यक्ष
२. उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय - सदस्य
३. आरोग्य अधिकारी, म.न.पा. - सदस्य
४. प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायीक विकास संस्था - सदस्य
५. महिला व बालविकास अधिकारी, म.न.पा. - सदस्य
६. कामगार अधिकारी, म.न.पा. - सदस्य
७. वार्ड अधिकारी, म.न.पा. - सदस्य
८. समाज विकास अधिकारी, म.न.पा. - सदस्य
९. स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी (दोन पैकी एक महिला) - सदस्य
१०. बालरक्षक समन्वयक शहर प्रतिनिधी - सदस्य
११. शिक्षण प्रमुख/ प्रशासन अधिकारी / शिक्षणाधिकारी - सदस्य सचिव

जिल्हास्तरीय व महानगर पालिका स्तरीय समितीचे कामकाज -

१. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ कायद्याची प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध विभागांचा दरमहा आढावा घेणे.
२. शाळाबाह्य मुलांची वर्षातून तीन वेळा सर्व विभागांच्या सहकार्याने शोध मोहीम हाती घेणे.
३. शोध मोहिमे करिता तंत्रज्ञानाचा वापर करून दरमहा बालकांच्या प्रगतीचा पाठपुरावा करण्यासाठी जिल्हा यंत्रणेवर जबाबदारी निश्चित करणेव्ही त्याबाबत बैठकीमध्ये आढावा घेणे.
४. शोध मोहिमेत सापडलेल्या बालकांच्या प्रवेशाची जबाबदारी संबंधित गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्र प्रमुख यांच्यावर तसेच बालकांना अध्ययन निष्पत्ती पर्यंत घेऊन जाण्यासाठी त्यानुसार मुल निहाय कृती कार्यक्रम तयार करण्याची व शिक्षकांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायीक विकास संस्था (DIECPD) यांच्यावर राहील. तसेच शैक्षणिक बाबींचा समिती आढावा घेऊन राज्य समितीकडे दरमहा अहवाल सादर करतील.
५. बालकांना किमान १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याच्या दृष्टीने आवश्यक विविध विभागांच्या शासकीय योजनांचा लाभ मिळत असल्याची खात्री करणे.
६. सरल सिस्टीम मध्ये स्थलांतरीत, शाळाबाह्य, अनियमित, बालकांची माहिती भरणे, शिक्षण हमी कार्ड अपलोड करणे बंधकारक करून त्याचा आढावा घेणे.
७. पालकांसोबत बालकांचे होणारे स्थलातर थांबविण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.
८. शक्यतो मूळ गावातच बालकांचे शिक्षण होईल याची काळजी घ्यावी, परंतु प्रयत्न करूनही बालके स्थलांतरीत होत असल्यास बालकांना जिल्ह्यातील इतर विभागांच्या असलेल्या निवासी वसतिगृहामध्ये किंवा हंगामी वसतिगृहामध्ये बालकांची स्थलांतराच्या कालावधीमध्ये तात्पुरती व्यवस्था करून देण्याचे संबंधितास निर्देश द्यावे.
१०.शालाबाह्य/वयानुरूप/स्थलांतरीत मुलांची नोंद सरल प्रणालीवर शाळा स्तरावरून मुख्याध्यापक यांनी घेणे बंधनकारक करण्यासाठी जिल्हा स्तर समिती वर जबाबदारी निश्चित करणे.
११.जिल्ह्यात होणा-या ग्राम सभांच्या बैठकी मध्ये शाळाबाह्य बालकांना नियमित करण्याचा तसेच स्थलांतर, बालमजुरी, बालविवाह थांबविण्यासाठी विषय अजेंड्यावर घेण्यात यावा. शाळाबाह्य मुक्त बालक जिल्हा/तालुका/केंद्र/शाळा करण्यासाठी व्यापक स्वरूपात जनजागृती करून उपाय योजना करावी.

ड) तालुकास्तर समिती -

१. तहसिलदार - अध्यक्ष
२. गटविकास अधिकारी - सह अध्यक्ष
३. मुख्याधिकारी, नगरपालिका - सदस्य
४. एकात्मिक बालविकास अधिकारी - सदस्य

५. शासकीय कामगार अधिकारी - सदस्य
६. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग - सदस्य
७. तालुका आरोग्य अधिकारी - सदस्य
८. साखर कारखान्याचे कार्यालयीन अधीक्षक/सचिव
९. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायीक विकास संस्था, अधिव्याख्याता - समता समन्वयक - सदस्य
१०. शिक्षण विस्तार अधिकारी - एक प्रतिनिधी - सदस्य
११. स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी (दोन पैकी एक महिला) - सदस्य
१२. तालुका बालरक्षक प्रतिनिधी, समावेशित शिक्षण विषय तज्ञ - सदस्य
१३. गटशिक्षणाधिकारी - सदस्य सचिव

**तालुकास्तरीय समितीचे कामकाज :-**

१) समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी. शाळाबाह्य मुलांची वर्षातून तीन वेळा सर्व विभागांच्या सहकार्याने दरवर्षी शोध मोहीम हाती घेणे.
२) शोध मोहिमे करिता तंत्रज्ञानाचा वापर करून दरमहा बालकांच्या प्रगतीचा पाठपुरावा करण्यासाठी तालुका यंत्रणेवर जबाबदारी निश्चित करणे. त्याचा बैठकीमध्ये आढावा घेणे.
३) तालुक्यातील तसेच स्थलांतर होऊन तालुक्यात आढळणाऱ्या बालकांना किमान १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याच्या दृष्टीने विविध विभागांच्या शासकीय योजनांचा लाभ मिळत असल्याची खात्री करणे.
४) सरल सिस्टीम मध्ये स्थलांतरीत, शाळाबाह्य, अनियमित, बालकांची माहिती विहित कालावधी मध्ये भरण्यासाठी बंधनकारक करणे तसेच समिती बैठका मध्ये आढावा घेणे.
५) स्थलांतरीत बालकांचे शिक्षण हमी कार्ड बाबत आढावा घेऊन अंमलबजावणी करणे.
६) पालकांसोबत बालकांचे होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी समुपदेशन, विशेष प्रयत्न करण्यासाठी केंद्र व शाळा समित्यांना निर्देश देणे.
७) प्रयत्न करूनही मुले स्थलांतरीत होत असल्यास बालकांना इतर विभागांच्या असलेल्या निवासी वसतीगृहामध्ये किंवा हंगामी वसतिगृहामध्ये बालकांची स्थलांतराच्या कालावधी मध्ये व्यवस्था करून देण्यासाठी प्रस्ताव जिल्हा समिती कडे सादर करणे.
८) तालुक्यात होणा-या ग्राम सभांच्या बैठकी मध्ये शाळाबाह्य बालकांना नियमित करण्याचा तसेच स्थलांतर, बालमजुरी, बालविवाह थांबविण्यासाठी विषय अजेंड्यावर घेण्यात यावा. शाळाबाह्य मुक्त बालक जिल्हा/तालुका/केंद्र/शाळा करण्यासाठी RTE - २००९ कायद्याचा प्रचार व प्रसार माध्यमांचा, लोकसहभाग, स्थानिक स्वयंसेवी संस्था, युवक / महिला मंडळे, बचत गट

महाविद्यालयीन विद्यार्थी, गाव पातळीवर होणारे एन.एस.एस. शिबिरे, जेष्ठ नागरिक, स्काऊट - गाईड, इत्यादीचा सहभाग वापर करून व्यापक स्वरूपात जनजागृती करावी.

९) दरमहा होणा-या शिक्षण परिषदामध्ये शाळाबाह्य बालकांचे शिक्षण विषयक एक तासिका प्राधान्यक्रमाने घेण्यात यावी. त्यामध्ये घेण्यात येणाऱ्या विषयांचे व तासिकेचे नियोजन करून दृक श्राव्य साधनाचा वापर करण्यात यावा.

१०) केंद्रात शाळाबाह्य, अनियमित बालकांसाठी काम करणाऱ्या उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षक, बालरक्षक यांना काम करण्यासाठी प्रोत्साहन देणे. जिल्ह्याच्या कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात यावा.

**इ) केंद्रस्तरीय/वार्ड समिती :-**

१ केंद्र प्रमुख - अध्यक्ष

२ शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निवडक किमान ५ सदस्य

३ साधन व्यक्ती - सदस्य

४ केंद्र बालरक्षक प्रतिनिधी

५ सीआरजी मधील रिसोर्स टीचर, भाषा, गणित विषयाचे प्रत्येकी एक प्रतिनिधी

६ केंद्रीय मुख्याध्यापक - सदस्य सचिव

**केंद्रस्तरीय समितीचे कामकाज :-**

१) दर दोन महिन्याला समिती सदस्यांची बैठक घेऊन आढावा घेऊन माहिती तालुका व जिल्हा समितीला सादर करणे.

२) स्थलांतर होऊन येणाऱ्या बालकांना शिक्षण हमी कार्ड द्वारे नजीकच्या शाळेत समाविष्ठ करणे किंवा वयानुरूप प्रवेश देणे बंधनकारक आहे. त्यासाठी केंद्रांतर्गत समाविष्ठ शाळांच्या नकाशा आधारित शाळा विकास शैक्षणिक आराखडा कार्यक्षेत्रात सातत्याने शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरित बालकांची शोध मोहीम घेणे. शोध मोहिमेतील सांख्यकीय माहिती अद्यावत ठेवणे.

३) पालकांचे प्रबोधन करून मुलांना नियमित शाळेत पाठविण्याची जबाबदारी पालकांनी घ्यावी याबाबत जनजागृती करणे. लोकसहभागा मधून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळवून देऊन किमान १२ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्यास मदत करणे.

४) केंद्रातील अंगणवाडी ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या मुलांना शिक्षण प्रवाहात टिकवून ठेवणे, सरल प्रणाली आणि गाव पंजिका मधील माहिती अद्यावत ठेवणे बंधनकारक राहील.

५) दरमहा होणा-या शिक्षण परिषदेत अभ्यासात मागे असलेल्या (अध्ययन स्तर निश्चिती/पायाभूत चाचणी/संकलित चाचणी नुसार) तसेच शाळाबाह्य, अनियमित, स्थलांतरीत बालकांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्याच्या संदर्भात मुल निहाय कृती आराखडा तयार करणे. आवश्यक असल्यास इतर

विभागांची मदत घेऊन बालकांच्या समस्या सोडविण्यात याव्या. बालकांची बोलीभाषा वेगळी असल्यास गरजेनुसार अध्यापन पद्धतीचा वापर करण्यासाठी जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायीक विकास संस्था, (DIECPD) मदत करतील. त्याचा दरमहा आढावा घेणे.

६) स्थलांतरित ऊसतोड मजूर, वीटभट्टी, दगडखाण, बांधकाम, धरणाची कामे इत्यादी ठिकाणी असलेल्या कुटुंबातील शाळेत न जाणारी बालके, वंचित समूह, अनुसूचित जाती, डोंबारी, पारधी, भिल्लवस्ती व जमाती, भटक्या विमुक्त जमातीचे समूह ज्या ठिकाणी स्थलांतर करून पाल टाकतात अश्या ठिकाणच्या वस्त्या, रस्तावरील भिक मागणारी व खेळणी, गजरे इत्यादी साहित्य विकणारी मुले, सिग्नलची ठिकाणे, हॉटेल, मिठागरे, शेती कामावरील उद्योग धंद्याच्या ठिकाणी बालकामगार म्हणून काम करत असलेली ठिकाणे, रेडलाईट एरिया मधील महिलांची मुले, झोपडपट्टी, बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजार, सार्वजनिक ठिकाणे इत्यादी ठिकाणी शाळाबाह्य, अनियमित बालके सापडण्याची शक्यता असणा-या सर्व संभाव्य ठिकाणांचा सातत्याने शोध घेण्यात यावा. पालकांचे समुपदेशन करून बालकांना शिक्षण सुविधा उपलब्ध करून द्यावी.

७) शाळाबाह्य आणि अभ्यासात मागे असलेल्या बालकांची संपादणूक पातळी वाढविण्यासाठी अनुरूप अध्ययन - अध्यापन पद्धती बाबत, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, अध्ययन निष्पती, शिक्षण हमी पत्रक (Education Guarantee Card), शाळाबाह्य, स्थलांतरीत बालकांची माहिती सरल सिस्टीम द्वारे अपडेट करणे, ड्रापबॉक्स मधील संख्या शून्यावर आणण्यासाठी काम करणे इत्यादी माहिती बैठकामधून देऊन त्यावर काम करणे.

८) केंद्रात शाळाबाह्य, अनियमित बालकांसाठी काम करणाऱ्या उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षक, बालरक्षक यांना काम करण्यासाठी प्रोत्साहन देणे. त्यांचा सत्कार करणे.

९) केंद्रात शाळाबाह्य, अनियमित बालकांसाठी काम करणाऱ्या उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षक, बालरक्षक यांना काम करण्यासाठी प्रोत्साहन देणे. त्यांचा केंद्र शिक्षण परिषद कार्यक्रमामध्ये सत्कार करण्यात यावा.

**ई) गावस्तर/शाळा स्तर समिती :-**

१. अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती - अध्यक्ष
२. गाव बालसंरक्षण समिती अध्यक्ष/ सरपंच - आमंत्रित सदस्य
३. पोलीस पाटील - सदस्य
४. तलाठी - सदस्य
५. ग्रामसेवक - सदस्य
६. आरोग्य सेवक - सदस्य
७. अंगणवाडी सेविका - सदस्य
८. आशा कार्यकर्ती - सदस्य

९. स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी (दोन, एक महिला) - सदस्य
१०. बालरक्षक प्रतिनिधी - सदस्य
११. मुख्याध्यापक - सदस्य सचिव

**गाव स्तर/शाळा स्तर समिती कामकाज :-**

१. शाळा बाह्य, शाळेत अनियमित असणारी, स्थलांतरित बालकांना शाळेच्या मुख्य प्रवाहात आणणे, टिकविणे व शिकविणे.
२. E-१ कधीही शाळेत दाखल न झालेली E-२ तीस दिवसापेक्षा जास्त दिवस अनुपस्थित बालके शोधणे.
३. समाजातील स्वयंप्रेरणेने व संवेदनशीलपणे काम करणाऱ्या व्यक्तींची मदत घेणे.
४. गाव पातळीवर आलेल्या सर्वच मजूर प्रकारातील बालकांना स्थानिक प्राधिकरण व SMC यांचे मदतीने शाळेत दाखल करनेबाबत पाठपुरावा करणे.
५. प्रत्येक मूल शिकू शकते अशी समतामुलक दृष्टीने काम करणे व प्रोत्साहित करणे.
६. स्थलांतर रोखणेबाबत गाव पातळीवर प्रेरणा सभा घेणे, समुपदेशन करणे, तरीही स्थलांतर झालेवर स्थलांतरित शाळेने कुठलाही मूळ पुरावा नसेल तरीही वयानुरूप इयत्ता प्रवेश देणे आवश्यक.
७. साखर कारखाने, विटभट्टी बांधकाम साईट, दगडखाणी वंचित समूहाची ठिकाणे या ठिकाणी प्रामुख्याने भेटी देवून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणेसाठी प्रयत्न करणे.
८. स्थानिक पातळीवर ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती, गाव बालसंरक्षण समिती तसेच नागरिकांच्या सहभागाने स्थलांतरीत कुटुंबांचा शोध घेणे. त्यांच्या मुलांचा शाळा प्रवेश व नियमित उपस्थितीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
९. सदर उपक्रम जलद गतीने व सर्वंकष पद्धतीने राबविण्यासाठी शासकीय यंत्रणेसोबतच विविध स्वयंसेवी संस्था, स्थानिक नागरिक समूह शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी व शक्य असल्यास त्रयस्थ व्यावसायिक संस्थेचा सहभाग घेणे.
१०. मा. तहसिलदार व तलाठी यांचेमार्फत परिसरातील सर्व नोंदणीकृत विटभट्टी मालक व बांधकाम व्यावसायिक यांचेकडून आपल्या कामगारांच्या ६ ते १४ वयोगटातील मुलांची शाळेसंबंधी माहिती विहित नमुन्यात व कालावधीत भरून घेणे. माहिती नजिकच्या जि.प. प्राथमिक शाळेत जमा करून संबंधितांच्या समन्वयाने सर्व मुलांचा शाळा प्रवेश निश्चित करणे. मुलांच्या शाळा प्रवेशाबाबत संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रतिज्ञापत्र घेणे.
११. ग्रामसेवकांनी ग्रामसभेत GR वाचन करणे. बालविवाह संदर्भात माहिती देणे, शाळाबाहय स्थलांतरित मूल यांची चर्चा घडवून आणणे. स्थलांतरित शाळाबाहय मुलांची सांख्यिकीय माहिती तालुका स्तर शिक्षण विभागाला व नजीकच्या शाळांना कळवणे.

प्रत्यक्ष शाळा प्रवेश, नियमित उपस्थिती :-

१. शाळाबाहय मुलांच्या शोध मोहिमेत आढळलेल्या मुलांना नजीकच्या कोणत्याही शाळेमध्ये तातडीने दाखल करण्यात यावे.स्थलांतरित कुटुंबामधून शाळेत दाखल झालेल्या मुलांची अधिकृत पटावर नावनोंदणी करून तसे प्रतिज्ञापत्र अहवालासोबत तालुका स्तरावरील समितीकडे सादर करण्यात यावे.
२. शाळा प्रवेशादरम्यान मुलांची अचूक जन्मतारीख माहिती नसल्यास अथवा शाळा सोडल्याचा दाखला नसल्यास प्रवेश नाकारू नये. पालकांकडून प्रतिज्ञापत्रावर / प्रवेश अर्जावर सदर माहिती भरून घेऊन ताबडतोब प्रवेश देण्यात यावा. (वाचा RTE २००९)
३. शाळाबाहय मुलांच्या शोध मोहिमेतून शाळेत वयानुरूप दाखल केल्या जाणाऱ्या मुलांची संभाव्य गळती रोखण्यासाठी सुरुवातीपासूनच विशेष वर्गाची अंमलबाजवणी करावी.तसेच परभाषिक मजुरांच्या मुलांना देखील मूलभूत भाषा शिक्षणासाठी विशेष वर्गात सहभागी करून घेण्यात यावे.
४. ऊसतोड मजूर, विटभट्टी मजूर, बांधकाम मजूर, यांची मुले प्रथम सत्रानंतर त्या त्या कार्यक्षेत्रात स्थलांतरित होत असली तरी त्यावेळी त्यांचा शोध व शाळा प्रवेश निश्चित करण्यासाठी गाव स्तरावरील समिति व संबंधित जि.प. शाळा यांनी शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासून नियोजन करून ठेवावे.

स्थलांतरित मुलांबाबत सरल प्रणालीमध्ये शाळास्तरावरून करावयाची कार्यवाही :-

१) शेवटचा वर्ग पूर्ण न करता student transfer :-

पालकांच्या स्थलांतरामुळे किवा इतर कारणामुळे विद्यार्थी शिकत असलेल्या शाळेत उपलब्ध असलेल्या शेवटच्या वर्गापर्यंत शिक्षण न घेता पुढील शिक्षणासाठी एका शाळेतून दुसऱ्या शाळेत जातात. अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीत सरल प्रणालीमध्ये एका शाळेत विद्यार्थ्यांची भरलेली माहिती दुसऱ्या शाळेत ऑनलाइन transfer होणे आवश्यक आहे. यासाठी सरल प्रणाली अंतर्गत असणाऱ्या student पोर्टल मध्ये student transfer करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

२) नवीन विद्यार्थ्यांची नोंद (student new entry) :-

नवीन विद्यार्थी म्हणजे शाळेत पहिल्यांदा प्रवेश घेणारा विद्यार्थी होय. अधिकांश विद्यार्थी हे शाळेतील इ.१ ली मध्ये प्रवेश घेतात. कोणत्याही शाळेत एकदा दाखल झालेला विद्यार्थी नवीन विद्यार्थी म्हणता येणार नाही. मात्र इतर राज्यांमधून आलेल्या विद्यार्थ्यांची नोंद नवीन विद्यार्थी म्हणून करण्यात येते.

३) **सतत गैरहजर राहणारे विद्यार्थी :-**

जे विद्यार्थी शाळेमध्ये सलग एक महिना किंवा त्यापेक्षा जास्त काळ गैरहजर आहेत, असे विद्यार्थी शिक्षण हक्क (RTE) कायद्या अंतर्गत केलेल्या नियमाप्रमाणे शाळाबाहय विद्यार्थी समजण्यात येतात.

३.१] शाळेत एखादा विद्यार्थी सलग एक महिन्यापेक्षा जास्त काळ गैरहजर असल्यास अशा विद्यार्थ्याला शाळेच्या पटावरून कमी करण्यासाठी student portal मध्ये drop box मध्ये टाकण्याची सुविधा देण्यात आली आहे.

३.२] असे सतत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थ्यास drop box मध्ये घालणे बंधनकारक आहे.

३.३] विद्यार्थी काही काळाने पुन्हा हजर झाल्यास अशा विद्यार्थ्यांना पुन्हा प्रणालीमध्ये घेण्यासाठी drop box मधून attach करण्याची सुविधा देण्यात आली आहे. या सुविधेचा उपयोग करून विद्यार्थी पुन्हा मूळ/जुन्या शाळेत येऊ शकतील.

४) **वर्गोन्नती :-**

सरल प्रणालीत drop box मधून येणारे विद्यार्थी हे पुढील प्रकारे असतात.

४.१] सतत गैरहजर राहणारे विद्यार्थी

४.२] इ. १० वी तील विद्यार्थ्यांचे Promotion केल्यानंतर ते विद्यार्थी drop box मध्ये दर्शविण्यात येतात.

४.३] इ. १२ वी तील विद्यार्थ्यांचे Promotion केल्यानंतर ते विद्यार्थी drop box मध्ये दर्शविण्यात येतात.

विद्यार्थ्यांचे Promotion करताना मागील शैक्षणिक वर्षामधील विद्यार्थ्यांचे online Promotion करण्याची कार्यवाही प्रलंबित असेल तर ती प्रथम पूर्ण केल्याशिवाय पुढील शैक्षणिक वर्षात Promotion करण्यासाठी विद्यार्थी data उपलब्ध होत नाही.

५) **शाळेतील शेवटचा वर्ग पूर्ण केलेल्या student transfer :-**

प्रत्येक शाळेच्या शेवटच्या वर्गातील विद्यार्थी वर्गोन्नत झाल्यानंतर शाळेमध्ये त्यापुढील कोणताही वर्ग नसल्यामुळे त्याच शाळेच्या drop box मध्ये ठेवण्याची सुविधा सरल प्रणालीत करून देण्यात आली आहे.

अशा प्रकारे सद्य स्थितीत उपरोक्त पद्धतीने drop box मध्ये विद्यार्थी दर्शविण्यात येत आहेत. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षासाठीची सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा/महाविद्यालये या सर्वांनी शाळेच्या drop box मध्ये येणाऱ्या विद्यार्थी संख्या 'O' (शून्यावर आणण्यासाठी/मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी) सहभागी होऊन वस्तुनिष्ठपणे माहिती अंतिम करावी.

Dropbox मध्ये विद्यार्थी संख्या कमी करण्यासाठीचे कार्य पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ/माध्य), प्राचार्य, DIECPD यांची राहील.

मुलांच्या माहितीशी निगडीत वर्गोन्नतीचे कार्य शाळेने केले की नाही हे सरल प्रणालीच्या माध्यमातून शासनास माहिती राहणार आहे. ज्या शाळा वर्गोन्नतीचे कार्य दिलेल्या विहित कालावधीत/मुदतीपर्यंत पूर्ण करणार नाहीत त्या शाळांवर जबाबदारी निशित करण्यात येईल.

प्रत्येक स्तरावर drop box बाबत किती काम पूर्ण झाले आहे याची माहिती प्रत्येक स्तरावरील अधिकाऱ्यांच्या log in च्या dash board वर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यांनी त्याप्रमाणे आपल्या क्षेत्रातील कामाचे Tracking करून सर्व कामे विहित वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावयाची आहे.

**Student portal मध्ये माहिती अंतिम करण्याची जबाबदारी पुढील प्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.**

१) शाळास्तर - मुख्याध्यापक

२) केंद्रास्तर - केंद्र प्रमुख

३) तालुका स्तर - गटशिक्षणाधिकारी

उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी अचूकपणे निकषानुसार व विहित कालावधीत करण्याबाबतची दक्षता संबंधित सक्षम अधिकारी/कर्मचारी यांनी घ्यावी. अन्यथा सबंधितांना जबाबदार धरण्यात येईल. जिल्हा स्तरावरून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांच्या अंतर्गत कार्यरत क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून सरल सिस्टीम अंतर्गत drop box मधील विध्यार्थ्याबाबत करावयाची कार्यवाही व मुल स्थलांतरित झाल्यास त्याला Education Guarantee Card देण्याची महत्वाची जबाबदारी सबंधित यंत्रणा व्यवस्थित पार पाडत नसतील तर त्यास शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक ) यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या सांकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक .................. असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(वंदना कृष्णा)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :-** मा. मंत्री शालेय शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

**प्रत :- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव -**

१. आयुक्त (शिक्षण), आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.

३. आयुक्त, साखर, साखर आयुक्तालय, पुणे.
४. आयुक्त, अल्पसंख्यांक विभाग, पुणे.
५. आयुक्त, आदिवासी विकास विभाग, पुणे.
६. आयुक्त, अपंगकल्याण आयुक्तालय, पुणे.
७. आयुक्त, महिला व बालकल्याण विभाग, पुणे.
८. आयुक्त, समाजकल्याण विभाग, पुणे.
९. आयुक्त, कामगार आयुक्तालय, पुणे.
१०. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.
११. शिक्षण संचालक, (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
१२. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
१३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ, पुणे.
१४. शिक्षण संचालक, (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण) शिक्षण संचालनालय, पुणे.
१५. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१७. विभागीय शिक्षण उपसंचालक, (सर्व विभाग)
१८. प्राचार्य, शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, (सर्व)
१९. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद, (सर्व)
२०. शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)
२१. शिक्षणाधिकारी, (प्राथमिक/माध्यमिक/निरंतर) जिल्हा परिषद, (सर्व)
२२. शिक्षणाधिकारी / शिक्षणप्रमुख / प्रशासनाधिकारी, महानगरपालिका, (सर्व)